क्रमांक ८००८/०७
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, ३ रा माळा,
८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी,
मुंबई ४०० ०१८

दिनांक १३/९/२००७

**परिपत्रक क्रमांक ३२७**

असे निर्दशनास आले आहे की, मुख्यालय व बृहन्मुंबई कार्यालयातील काही कर्मचारी कार्यालयीन वेळेनंतरही कार्यालयात बराच वेळ थांबलेले असतात. याव्दारे सर्व कर्मचाऱ्यांना सूचित करण्यांत येते की, कार्यालयीन वेळेनंतर सायंकाळी फक्त ६.०० वाजेपर्यन्तच कार्यालयात केवळ कार्यालयीन कामकाजाकरीता कर्मचारी थांबू शकतील. त्यानंतरही थांबणे अगत्याचे असल्यास संबंधित अधिकारी वा अधिक्षकांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

तसेच कार्यालयीन वेळेनंतर कर्मचाऱ्यांनी कार्यालय सोडतांना पंखा व लाईट बंद करण्याची दक्षता घ्यावी. कामगिरीवर असलेल्या पहारेकऱ्यांनी याबाबत संपूर्ण कार्यालय फिरुन पंखे व लाईट बंद असल्याची खात्री करुन घ्यावी.

धर्मादाय आयुक्त,(प्र)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत
१. धर्मादाय सह आयुक्त मुंबई/बृहन्मुंबई
२. धर्मादाय उप आयुक्त, मुख्यालय/बृहन्मुंबई
३. सहायक धर्मादाय आयुक्त, मुख्यालय/बृहन्मुंबई
४. सर्व अधिक्षक, मुख्यालय/बृहन्मुंबई
५. सर्व पहारेकरी.